# Spark Film Festival 2021

# Media Publicity

## शिवाजी विद्यापीठातर्फे आज स्पार्क फिल्म फेस्टिवल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने पाचव्या स्पार्क फिल्म फेस्टिवलचे आयोजन 'गुगल मिट' या ऑनलाईन माध्यमातून दि. १९ जून रोजी सकाळी ११ ते १ यादरम्यान करण्यात आले आहे. या स्पार्क फिल्म फेस्टिवलचे प्रमुख पाहुणे म्हणून निर्मिती जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार आहेत. यावेळी ते कोविड आणि आरोग्यविषयक जाहिराती या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये मनाली पाटील (पॉझिटिव्ह ॲप्रोच), अनुराधा धामणे (लेटस् मास्क अप), निहारिका देशपांडे (सुनो पेनडामिक), प्रणाली पवार (स्टे होम स्टे सेफ), अतुल होवाळे (युज मास्क डिस्पोज प्रॉपरली), विनायक लोहार (जर्म्स आर नॉट फोर शेअरिंग), सोमदत्त देसाई (वी द ह्युमन), या जाहिरातींचे स्क्रीनिंग करण्यात येईल. यावेळी विभागाचे माजी विद्यार्थी आणि लघुपट निर्माते मल्हार जोशी आणि आकाश बोकमूरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या पूर्णविराम या लघुपटाचे स्क्रीनिंग करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे. यासाठी विशेष साहाय्य चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, लघुपट निर्माता शैलेश कोरे, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

**Punyanagari 19-06-2021**

लोकमत

# विद्यापीठात 'स्पार्क फिल्म फेस्टिवल'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागातर्फे पाचव्या स्पार्क फिल्म फेस्टिवलचे आयोजन 'गुगल मिट' या ऑनलाइन माध्यमातून आज शनिवारी सकाळी अकरा ते दुपारी एक यावेळेत केले आहे. या फेस्टिवलसाठी निर्मिती जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार हे प्रमुख उपस्थित असणार आहेत. 'कोविड-१९ आणि आरोग्यविषयक जाहिराती या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. मास कम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कोरोना काळात घ्यावयाच्या काळजी विषयीच्या आरोग्यविषयक जाहिरातींचे सादरीकरण यावेळी होणार आहे.

Hello Kolhapur
Page No. 2 Jun 19, 2021
Powered by: erelego.com

**Lokmat 19-06-2021**

# विद्यापीठात ‘स्पार्क’ चित्रपट महोत्सव

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे ‘स्पार्क’ चित्रपट महोत्सवाचे गुगल मीटद्वारे ऑनलाइन पद्धतीने आयोजन केले. महोत्सवाचे यंदा पाचवे वर्ष होते. ‘कोरोना काळात घ्यायची काळजी’ यावर विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लघुपटांचे प्रदर्शन केले.

‘निर्मिती’ जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार यांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. त्यांनी ‘कोविड-१९ आणि आरोग्यविषयक जाहिराती’ यावर बीजभाषण केले. कोरोना काळात केवळ मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करणे, एकमेकांत अंतर ठेवणे या प्राथमिक गरजांपलीकडे परिस्थिती गेली आहे. सध्या अनेकजण रुग्णांना अन्न पुरवणे, आर्थिक आणि मानसिक आधार देणे, अशी समाजोपयोगी कामे करताना दिसत आहेत. याचे भान राखून हा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे आणि





लघुपट हे त्यासाठी उत्तम माध्यम आहे, असे मत श्री. खासबारदार यांनी व्यक्त केले.

चित्रपट महोत्सवात विभागाचे माजी विद्यार्थी मल्हार जोशी, आकाश बोकमूरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या ‘पूर्णविराम’ लघुपटाचे प्रदर्शन केले. तसेच लघुपटनिर्माते शैलेश कोरे यांच्या ‘वाकळ’ लघुपटाचेही प्रदर्शन झाले. विभागाचे विद्यार्थी मनाली पाटील (पॉझिटिव्ह ॲप्रोच), अनुराधा धामणे (लेट्स मास्क अप), निहारिका देशपांडे (सुनो पँडेमिक), प्रणाली पवार (स्टे होम, स्टे सेफ), अतुल होवाळे (यूज मास्क, डिस्पोझ प्रॉपरली), विनायक लोहार (जर्म्स आर नॉट फॉर शेअरिंग), रुणाल भोई (डोन्ट लेट जर्म्स गेट यू डाऊन), सोमदत्त देसाई (वी द ह्युमन) या जाहिरातपर लघुपटांचे प्रदर्शन झाले. श्री. खासबारदार यांनी विद्यार्थ्यांचे लघुपट पाहून त्यांना प्रोत्साहन दिले आणि मार्गदर्शन केले.

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी आयोजन केले. चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, लघुपट निर्माते शैलेश कोरे, प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांनी विशेष साहाय्य केले. निमते सरफराझ मुल्ला यांनी आभार मानले. प्रख्यात धावपटू मिल्खा सिंग यांना आदरांजली वाहिली. मुंबई विद्यापीठाचे डॉ. प्रसाद ठाकूर, प्रा. जयप्रकाश पाटील, जयेंद्र राणे, प्रा. अश्विनी कांबळे, प्रा. चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार आदींचा समावेश होता.

**Sakal 20-06-2021**

# लघुपट जनजागृतीचे उत्तम माध्यम

## अनंत खासबारदार यांचे मत, विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशनतर्फे 'स्पार्क'चे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

फोफावत चाललेल्या सध्या कोरोनाच्या काळात मास्क, सॅनिटायझरचा वापर करणे, सोशल डिस्टन्स ठेवणे, या उपायाच्या पलीकडे जाऊन काम करण्याची गरज निर्माण झाली आहे. सध्या अनेकजण कोरोना बाधितांसह गरजूंना धान्य व आर्थिक स्वरुपात मदत करुन मानसिक आधार देत आहेत. या मदतकार्यावर आधारीत उत्तम लघुपटांची निर्मिती करुन देशभरातील नागरिकांना माणुसकीचे दर्शन घडवावे, असे आवाहन निर्मिती संस्थेचे अनंत खासबारदार यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभाग आयोजित 'स्पार्क' चित्रपट महोत्सवात ते बोलत होते. गुगल मीटद्वारे ऑनलाईन पद्धतीने झालेल्या या महोत्सवाचे यंदा पाचवे वर्ष होते. खासबारदार यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. महोत्सवात मुंबई विद्यापीठाचे डॉ. प्रसाद ठाकूर, बारामती महाविद्यालयाचे प्रा. जयप्रकाश पाटील, जयेंद्र राणे, खासगी विद्यापीठातील पत्रकारितेच्या व्याख्यात्या अनुराधा इनामदार, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनच्या सेवानिवृत्त प्राध्यापक अश्विनी कांबळे, विभागातील सहयोगी प्राध्यापक चंद्रशेखर वानखेडे आदी सहभागी झाले होते.



स्पार्क चित्रपट महोत्सवाचे आयोजन

महोत्सवाच्या नियोजनाप्रमाणे खासबारदार यांनी 'कोविड आणि आरोग्यविषयक जाहिराती' या विषयांवर भाषण केले. ते म्हणाले, कोरोनाचा काळ दिवसेंदिवस महाभयानक बनत चालला आहे. अशा परिस्थितीत लोकजागृती करण्यासाठी लघुपट हे उत्तम माध्यम आहे.

यानंतर मास कम्युनिकेशनचे माजी विद्यार्थी मल्हार जोशी आणि आकाश बोकमूरकर दिग्दर्शित 'पूर्णविराम' व लघुपट निर्मिती शैलेश कोरे यांच्या 'वाकळ' या लघुपटांचेही प्रदर्शन झाले. तसेच विभागाचे विद्यार्थी मनाली पाटीलनेच्या पॉझिटिव्ह ॲप्रोच, अनुराधा धामणेच्या लेटस् मास्क अप, निहारिका देशपांडेच्या सुनो पँडेमिक, प्रणाली पवारच्या स्टे होम–स्टे सेफ, अतुल होवाळेच्या यूज मास्क–डिस्पोझ प्रॉपरली, विनायक लोहारच्या जर्म्स आर नॉट फॉर शेअरिंग, ऋणाल भोईच्या डोन्ट लेट जर्म्स गेट यू डाऊन आणि सोमदत्त देसाईच्या वुई द ह्युमन यावर आधारीत लघुपट दाखवले. मास कम्युनिकेशनच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे–पवार यांनी महोत्सवाचे संयोजन केले. चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, विभागाचे प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांचे विशेष सहकार्य लाभले.

**Tarun Bharat 20-06-2021**

पुण्यनगरी

# कोरोनाबाबत जनजागृतींसाठीं लघुपट उत्तम माध्यम

## अनंत खासबारदार : शिवाजी विद्यापीठात 'स्पार्क' चित्रपट महोत्सव

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोरोना काळात केवळ मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करणे, एकमेकांत अंतर ठेवणे या प्राथमिक गरजांपलीकडे आता परिस्थिती गेली आहे. लोकांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे आणि लघुपट हे त्यासाठी उत्तम माध्यम आहे, असे प्रतिपादन 'निर्मिती' जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने शनिवारी 'स्पार्क' चित्रपट महोत्सव गुगल मीटद्वारे ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. महोत्सवाचे यंदा पाचवे वर्ष असून, 'कोरोना काळात घ्यायची काळजी' या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या जाहिरातपर लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले. अनंत खासबारदार यांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन झाले. त्यांनी 'कोविड-१९ आणि आरोग्यविषयक जाहिराती' विषयावर बीजभाषण केले. महोत्सवात विभागाचे माजी



विद्यार्थी मल्हार जोशी, आकाश बोकमूरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'पूर्णविराम'चे प्रदर्शन करण्यात आले. लघुपट निर्माते शैलेश कोरे यांच्या 'वाकळ' या लघुपटाचेही प्रदर्शन झाले. विभागाचे विद्यार्थी मनाली पाटील (पॉझिटिव्ह ॲप्रोच), अनुराधा धामणे (लेट्स मास्क अप), निहारिका देशपांडे (सुनो पँडेमिक), प्रणाली पवार (स्टे होम, स्टे सेफ), अतुल होवाळे (यूज मास्क, डिस्पोझ प्रॉपर्ली), विनायक लोहार (जर्म्स आर नॉट फॉर शेअरिंग), रुणाल भोई (डोन्ट लेट जर्म्स गेट यू डाऊन) आणि सोमदत्त देसाई (वुई दी ह्युमन) या जाहिरातपर लघुपटांचे प्रदर्शन झाले. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत केले.

चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, लघुपट निर्माते शैलेश कोरे यांच्यासह विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांनी यासाठी विशेष सहाय्य केले. माहितीपट निर्माते सर्फराझ मुल्ला यांनी आभार मानले. डॉ. प्रसाद ठाकूर, प्रा. जयप्रकाश पाटील, जयेंद्र राणे, माजी प्रा. अश्विनी कांबळे, प्रा. चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार यांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शवली.

**Punyanagari 20-06-21**

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन 'स्पार्क' महोत्सव

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने शनिवारी 'स्पार्क' चित्रपट महोत्सवाचे गुगल मीटद्वारे ऑनलाइन रंगला. महोत्सवाचे यंदा पाचवे वर्ष होते. 'कोरोना काळात घ्यायची काळजी' या विषयावर विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या जाहिरातपर लघुपटांचे यावेळी प्रदर्शन करण्यात आले.

येथील 'निर्मिती' जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार यांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन झाले. त्यांनी 'कोविड-१९ आणि आरोग्यविषयक जाहिराती' या विषयावर बीजभाषण केले. या महोत्सवात मल्हार जोशी, आकाश बोकमूरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'पूर्णविराम' आणि शैलेश कोरे यांच्या 'वाकळ' या लघुपटाचेही प्रदर्शन झाले. विभागाचे विद्यार्थी मनाली पाटील (पॉझिटिव्ह ॲप्रोच), अनुराधा धामणे (लेट्स मास्कअप), निहारिका देशपांडे (सुनो पॅंडेमिक), प्रणाली पवार (स्टे होम, स्टे सेफ), अतुल होवाळे (यूज मास्क, डिस्पोझ प्रॉपरली), विनायक लोहार (जर्म्स आर नॉट फॉर शेअरिंग), रुणाल भोई (डोन्ट लेट जर्म्स गेट यू डाऊन), सोमदत्त देसाई (वी द ह्युमन) या जाहिरातपर लघुपटांचे प्रदर्शन झाले. धावपटू मिल्खा सिंग यांना आदरांजली वाहण्यात आली. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी महोत्सवाचे आयोजन केले. प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांनी विशेष साहाय्य केले.

Kolhapur Main
Page No. 2 Jun 21, 2021
Powered by: erelego.com

**Lokmat 21-06-21**